# मेट्रो ३ च्या पहिल्या टप्प्यात १० ट्रेन

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

कुलाबा वांद्रे सिप्झ ३ मार्गाच्या पहिल्या टप्प्यात किमान १० ट्रेन सेवेत असतील. सध्या एक ट्रेन असून तिची मध्यंतरी चाचणी पूर्ण करण्यात आली. सिप्झ ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे लक्ष आहे.

नव्या डेपोत मे किंवा जून महिन्यापर्यंत ट्रेन ठेवण्याची व्यवस्था होईल. ट्रेन ठेवण्याची व्यवस्था झाल्यावर टप्प्याटप्प्याने ट्रेन आणल्या जातील. दर दोन महिन्याला एक ट्रेन मुंबईत दाखल होईल. ट्रेन बांधणीचे काम आंध्र प्रदेशात सुरू आहे. आरेत सध्या कारडेपोचे काम सुरू आहे. ८४ झाडे तोडण्याची परवानगी मिळाल्याने काम अधिक वेगाने पूर्ण होईल. २४ ट्रेन ठेवण्याची या डेपोची क्षमता आहे. २०५० सालापर्यंत एकूण ५० ट्रेन मेट्रो -३ च्या ताफ्यात असतील.

**सिद्धीविनायक स्थानक ८५ टक्के**

सिद्धीविनायक स्थानकाचे काम ८५ टक्के पूर्ण झाले असून स्थानकाच्या आतील अन्य कामे ५५ टक्के पूर्ण झाली आहेत. या स्थानकाच्या बाहेर सिद्धीविनायक मंदिर आहे. मंदिरात दररोज हजारो भाविक येत असतात. त्यामुळे भविष्यात सिद्धीविनायक स्थानक हे मेट्रो -३ मार्गावरील सर्वाधिक गर्दीचे स्थानक ठरेल, असा अंदाज आहे.